# अॅग्रोमेट अॅडवायझरी बुलेटीन

ग्रामीण कृषि मौसम सेवा, ऐएमएफयु,

## कृषी हवामानशास्त्र विभाग

फोन : ०२०-२५५३८००९ कृषी महाविद्यालय, पुणे ४११ ००५ ई-मेल : amfupune@gmail.com


## हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. १७/०१/२०२०

## जिल्हा : सोलापूर

### हवामान अंदाज :

| हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामानाचा अंदाज (१७/०१/२०२० ते २१/०१/२०२०) | | | | |
|---|---|---|---|---|---|
| दिनांक | 18 | 19 | 20 | 21 | 22 |
| पाऊस (मिमी) | 0 | 0 | 0 | 0 | 0 |
| कमाल तापमान (अं.से.) | 32 | 33 | 33 | 32 | 32 |
| किमान तापमान (अं.से.) | 18 | 19 | 20 | 19 | 19 |
| ढग स्थिती (आकाश) | 0 | 1 | 2 | 2 | 2 |
| सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | 49 | 49 | 61 | 58 | 48 |
| दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | 28 | 31 | 37 | 30 | 26 |
| वाऱ्याचा वेग (किमी/तास) | 13 | 14 | 11 | 9 | 10 |
| वाऱ्याची दिशा (अंश) | 113 | 107 | 120 | 232 | 121 |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | पीक अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश/ इशारा | | भारतीय हवामान खात्याच्या अंदाजानुसार जिल्ह्यात पुढील पाचही दिवस हवामान कोरडे राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | जिल्ह्यातील रब्बी हंगामात पेरलेल्या ज्वारी, गहू व हरभरा पिकाची कोळपणी व खुरपणी करुन पिक तणविरहीत ठेवावे जेणेकरून तणांची अनद्रव्यांसाठीची स्पर्धा रोखण्यास मदत होईल. कोरडे हवामान लक्षात घेता रब्बी पिके , भाजीपाला व फळबागांना स्थानिक परिस्थिती, जमिनीची खोली/ जमिनीचा प्रकार व गरजेनुसार पाणी द्यावे. |
| गहू | पिक वाढीची अवस्था | तणनियंत्रण व जमिनीत ओलावा टिकून राहण्यासाठी गहू पिकात आंतरमशागत करावी. गहू पिकाच्या ज्या महत्त्वाच्या अवस्था आहेत, त्या वेळी पिकास पाणी देणे फायद्याचे आहे. पहिले पाणी पेरणीनंतर २० ते २२ दिवसांनी (मुकुटमुळे फुटण्याची वेळ), दुसरे पाणी ४२ ते ४५ दिवसांनी (कांडी धरण्याची वेळ) आणि तिसरे पाणी ६० ते ६५ दिवसांनी (पीक ओंबीवर येण्याची वेळ) द्यावे तसेच स्थानिक परिस्थिती व जमिनीच्या खोलीनुसार पाण्याच्या दोन पाळ्यामध्ये अवशक्तेनुसार अंतर ठेवावे. |
| आंबा | मोहोर | आंब्यावर तुडतुडयांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने इमिडाक्लोप्रिड १७.८ एस.एल. ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारावे. |
| ऊस | लागवड | सुरु ऊसाची लागवड करण्यासाठी शेत तयार करुन सुरु ऊसाची लागवड करावी. ऊस बेणे लागणीपूर्वी १०० लिटर पाणी + ३०० मि.ली.मेलॅथिऑन + १०० ग्रॅम कार्बेन्डॅझिम (बाविस्टीन) १० मिनीटांसाठी बेणे प्रक्रिया केल्यानंतर जिवाणूंची बीज प्रक्रिया करावी. यामुळे बुरशीजन्यरोग व खवले किडीचा बंदोबस्त होतो. अॅसेटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जीवाणू खतांचे प्रमाण अनुक्रमे १० किलो |

| | | |
|---|---|---|
| | | आणि १.२५ किलो प्रति १०० लिटर पाण्यात मिसळून केलेल्या द्रावणात उसाच्या टिप-या ३० मिनीटे बुडवून लागण करावी. त्यामुळे नत्र खतामध्ये ५० टक्के तर स्फुरद खतामध्ये २५ टक्के बचत करता येते. |
| हरभरा | फुलोरा ते घाटे अवस्था | हरभ-यावरील घाटे अळीच्या नियंत्रणासाठी रासायनिक किटकनाशक क्लोरट्रॅनिलिप्रोल १८.५ एस.सी २.५ मिली प्रति १० लिटर किंवा इमामेक्टीन बेंझोएट ५ एस.जी ४ ग्रॅम प्रति १० लिटर हरभरा पिकावर सरासरी १ अळी प्रती झाड आढळून आल्यास पाण्यात मिसळून फवारावे. |
| कापूस | बोंडे पक्वता वेचणी अवस्था | पुढील हंगामात कापसावरील शेंदरी बोंड अळीचा प्रादुर्भाव टाळण्यासाठी कापूस पिकाची वेचणी पुर्ण करावी व पिक काढून टाकावे तसेच खोडवा/फरदड किंवा दुबार पिक घेण्याचे पूर्णतः टाळावे . हंगामाबाहेर पिके घेतल्यास आर्थिक नुकसान होवून किडींना अखंड अन्न पुरवठा होतो व पुढील वर्षीच्या पिकावर किडींचा प्रादुर्भाव लवकर व जास्त प्रमाणात होतो. |
| कांदा | पिक वाढीची अवस्था | सध्याच्या हवामानामुळे कांदा पिकावरील करपा रोगाच्या नियंत्रणासाठी डायथेन एम-४५; २५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. कांदा पिकावरील फुलकिडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० **%** प्रवाही १५ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ **%** प्रवाही ६ मिली या किटकनाशकांच्या प्रति १० लिटर पाण्यात मिसळून आलटून पालटून फवारण्या कराव्यात. |
| तूर | फुलोरा ते शेंगा अवस्था | तुरीवरील घाटेअळीचे नियंत्रणासाठी स्पिनोसॅड ४५ एस सी २.५ मिली प्रति १० लिटर पाण्यातून किंवा इमॅमेक्टीन बेन्झोएट ५ एस जी ४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारावे. |
| भाजीपाला | पिक वाढीची अवस्था | भाजीपाला पिकावरील रसशोषक किडींच्या नियंत्रणासाठी डायमिथोएट ३० ईसी १५ मिली किंवा लॅम्बडासाय हॅलोथ्रीन ५ ईसी ६ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळुन फवारणी करावी. |
| कोबीवर्गीय पिके | पिक वाढीची अवस्था | कोबी पिकावरील मावा व फुलकोबीतील गड्डा पोखरणाऱ्या अळीच्या नियंत्रणासाठी म्यलेथिओन ५० ई . सी . २० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारावे किंवा ४ % निंबोळी अर्काची फवारणी करावी. |
| जनावरांचे व्यवस्थापन | | जनावराच्या गोठ्यामध्ये व कुकुटपालनात (मोठे बल्प लावावेत) उबदार वातावरण राहील अशी काळजी घ्यावी. मेंढ्यांना आंत्रविषार व घटसर्प रोगांवर प्रतिबंध उपाय म्हणून लसीकरण करुन घ्यावे. |

***टिप : शेतकरीबंधूनी पिकावर किटकनाशकाची, बुरशीनाशकाची फवारणी करताना स्वत:ची योग्यती खबरदारी/ काळजी घ्यावी.**

**स्त्रोत :**

१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.

२) मागील हवामान : -

ठिकाण : कृ .म.वि., पुणे.

दि. : १७.०१.२०२०

**स्वाक्षरीत**

**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, पुणे तथा**

**प्रमुख, कृषि हवामानशास्त्र विभाग, कृ.म.वि., पुणे**